महसूल विभाग अंतर्गत भूमि अभिलेख विभागाच्या आस्थापनेवरील अधिकारी /कर्मचारी यांचेकरीता शिस्तभंगविषयक कारवाईच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी घोषित करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-०९२६/प्र.क्र.१२४/आस्था-५(E-१८७१६७१)
मादम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (मुख्य), मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- १६ नोव्हेंबर , २०२६

वाचा:- १.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.वशिअ-२०२५/प्र.क्र.१७/विचौ-१,दि.७/४/२०२५.

प्रस्तावना:-

शासकीय कर्तव्ये पार पाडीत असताना शासकीय कर्मचाऱ्याकडून घडलेल्या अपराध, गैरवर्तणूक किंवा गैरवर्तनाच्या अनुषंगाने जेव्हा म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम, १९७९ अनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे योजिले जाते, तेव्हा अशी शिस्तभंगविषयक कार्यवाही करताना ती सक्षम प्राधिकाऱ्याने निर्देशित करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेशिवाय आदेशीत केलेली विभागीय चौकशी तसेच देण्यात आलेली शिक्षा विधी अग्राहय ठरते व त्यामुळे अपराधसिध्दी होऊनही संबंधित अपचाऱ्यास दिलेल्या शिक्षेची अंमलबजावणी होत नाही.

२. शिस्तभंग विषयक कारवाईच्या अनुषंगाने संविधानाच्या अनुच्छेद ३११ च्या खंड (१) अनुसार बडतर्फी व सेवेतून काढून टाकण्याची शिक्षा देण्याचे अधिकार संबंधिताच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यापेक्षा दुय्यम प्राधिकाऱ्यास नाहीत. अन्य शिक्षांच्या बाबतीत नियुक्ती प्राधिका-यास दुय्यम असलेल्या अधिकाऱ्याकडे अधिकार सोपविता येतात. यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने वाचा क्र.१ येथील दि.०७.०४.२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये, सर्व प्रशासकीय विभागांना त्यांचे नियंत्रणाखालील अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता शिस्तभंगविषयक सक्षम प्राधिकारी कोण असतील, याबाबचे आदेश निर्गमित करणेबाबत सूचित केले आहे.

३. त्यास अनुलक्षून महसूल विभाग अंतर्गत भूमि अभिलेख विभागाच्या आस्थापनेवरील अधिकारी /कर्मचारी यांचेकरीता शिस्तभंगविषयक कारवाईच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:-

महसूल विभाग अंतर्गत भूमि अभिलेख विभागाच्या आस्थापनेवरील अधिकारी /कर्मचारी यांचेकरीता शिस्तभंगविषयक कारवाईच्या अनुषंगाने खालील विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे **"सक्षम प्राधिकारी"** घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

विवरणपत्र

अ.क्र.	पदनाम गट (अ/ब/क/ड)	नियुक्ती प्राधिकारी (पदनाम, गट)	किरकोळ शिक्षा करण्यास सक्षम प्राधिकारी (पदनाम, गट)	जबर शिक्षा करण्यास सक्षम प्राधिकारी (पदनाम, गट)	अपिलीय प्राधिकारी
	गट-अ				
१	उपसंचालक भूमि अभिलेख (वेतन स्तर एस-२३: ६७७००-२०८७००)	मा. मुख्यमंत्री	मा. मुख्यमंत्री	मा. मुख्यमंत्री	मा.राज्यपाल
२	जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख (वेतन स्तर एस-२०: ५६१००-१७७५००)	मा.मंत्री (महसूल)	मा.मंत्री (महसूल)	मा.मंत्री (महसूल)	
	गट-ब				
३	उप अधीक्षक भूमि अभिलेख (वेतन स्तर एस-१५: ४१८००-१३२३००)	मा.मंत्री (महसूल)	मा.मंत्री (महसूल)	मा.मंत्री (महसूल)	मा.राज्यपाल
	गट- क				
४	शिरस्तेदार (वेतन स्तर एस-१३: ३५४००-११२४००)	संबंधित विभागाचे उपसंचालक भूमि अभिलेख	जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख	१. उपसंचालक भूमि अभिलेख (**किरकोळ शिक्षा**) २.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे (**जबर शिक्षा**)
५	परिरक्षण भूमापक (वेतन स्तर एस-८: २५५००-८११००)				
६	भूकरमापक, (वेतन स्तर एस-६: १९९००-६३२००)				
	गट- ड				
७	नाईक/ दप्तरबंद (वेतन स्तर एस-३: १६६००-५२४००)	संबंधित विभागाचे उपसंचालक भूमि अभिलेख	संबंधित विभागाचे उपसंचालक भूमि अभिलेख	संबंधित विभागाचे उपसंचालक भूमि अभिलेख	जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे
८	शिपाई (वेतन स्तर एस-१: १५०००-४७६००)				

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१११६१७२३३५३४८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHWINI BHIMRAO YAMGAR

Digitally signed by ASHWINI BHIMRAO YAMGAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=F0B627B3230194FA84BD0E5B4EB590E81C2C15CE998BA19F4825B4AC3EEE13CE, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1E31BE6F920A3D606925AB728A537257F35F1F0BE19B929C1B0DDCBA1E893668, cn=ASHWINI BHIMRAO YAMGAR
Date: 2026.11.16 17:24:31 +05'30'

(अश्विनी यमगर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मा.मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालयख मुंबई.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
५. मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग (वि.चौ.-१),मंत्रालय,मुंबई.
७. उप सचिव (आस्था-५), महसूल व वन विभाग , मंत्रालय, मुंबई.
८. सर्व उपसंचालक भूमि अभिलेख/जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय
९. निवड नस्ती (आस्था-५)